# केंद्रिय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम
## (संपूर्ण स्वच्छता अभियान)

**पेयजल आपूर्ति विभाग**

**ग्रामीण विकास मंत्रालय**

**भारत सरकार**

**जानेवारी २००४**

# प्रस्तावना

भारतातील ग्रामीण स्वच्छतेची व्यापकता २००१ च्या जनगणनेनुसार फक्त २२ टक्केच होती. ही व्यापकता वाढविण्यासाठी आणि ग्रामीण लोकांच्या अडचणी आणि त्रास कमी करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न होण्याची गरज आहे. ग्रामीण स्वच्छतेची व्यापकता वाढण्यासाठी १९८६ साली केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम सुरू करण्यात आला पण त्याच्या यंत्रणेतील त्रुटींमुळे हा कार्यक्रम फार पुढे जाऊ शकला नाही. केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची १९९९ मधे पुनर्रचना करण्यात आली आणि त्याजागी मागणी आधारित लोकसहभागीय तत्त्वावर संपूर्ण स्वच्छता अभियान ही योजना सुरू करण्यात आली. त्याप्रमाणे आज हे अभियान ३७४ जिल्ह्यात राबविले जात आहे. येत्या २ वर्षात संपूर्ण देशात संपूर्ण स्वच्छता अभियान राबविले जाईल.

गेली पाच वर्षे संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी होत आहे आणि त्यातून नवीन माहिती मिळाली आहे, स्वच्छतेच्या बाबतीत नवीन दृष्टिकोन तयार झाला आहे आणि त्याच्यानुसार प्रचलित मार्गदर्शक तत्त्वांमधे सुधारणा केली आहे. या अभियानात आंगणवाडी आणि ग्रामीण शाळांमधे स्वच्छता आणि आरोग्य याविषयी शिक्षण देण्यावर भर दिला आहे. याशिवाय केंद्र शासनाने या मार्गदर्शक तत्त्वात अभियानाची व्यापकता वाढावी, यासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान योजना म्हणून निर्मल ग्राम पुरस्काराचा अंतर्भाव केला आहे. मला अशी आशा आहे की, नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार ग्रामीण भारतातील स्वच्छतेच्या सर्व पैलूंना स्पर्श करत या योजनेच्या अंमलबजावणीला योग्य वेळ देणे, हे व्यापकता वाढवण्यासाठी कार्यरत असणाऱ्या प्रशासक आणि क्षेत्र कार्यवाहकांसाठी उपयुक्त ठरेल.

नवी दिल्ली (पालात मोहनदास)
जानेवारी ३०, २००४

## उपोद्घात

संपूर्ण स्वच्छता अभियान ग्रामीण स्वच्छतेच्या क्षेत्रातील सुधारणाचे वाहक आहे. केंद्रिय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची पुनर्रचना करून १९९९ मध्ये संपूर्ण स्वच्छता अभियान सुरू झाले. हे अभियान मागणी तत्त्वावर आधारित आहे आणि त्याची अंमलबजावणी लोकसहभागातून करण्यात येणार आहे.

या अभियानामधे माहिती, शिक्षण आणि संवादातून लोकांचा दृष्टिकोन आणि आरोग्याच्या सवयी सुधारण्यासाठी जाणीव जागृती करण्यावर भर देण्यात येतो. हा कार्यक्रम दारिद्रय रेषेखालील कुटुंबांसाठी शौचालय बांधणे यापुरता मर्यादित नाही, तर लोकसहभागीय तत्त्वावर मागणीनुसार स्वच्छतेच्या सुविधा पुरवणे, प्रत्येक कुटुंबाच्या आर्थिक स्तरानुसार आणि हवामानाच्या परिस्थितीनुसार योग्य तंत्र वापरणे यातून प्रक्रिया सक्षम करणे, असा हा कार्यक्रम आहे.

गेल्या पाच वर्षातील संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीतून मौलिक अनुभव मिळाला आहे. प्रत्येक राज्यात हे अभियान वेगवेगळया गतीने चालू आहे. क्षेत्र कार्यवाहकांच्या अनुभवावर आधारित बदलत्या परिस्थितीनुसार मार्गदर्शक तत्त्वात सुधारणा करण्याची आवश्यकता वाटली. मे २००२ मध्ये मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध झाल्यानंतर शाळा आणि आंगणवाड्या येथील स्वच्छता आणि आरोग्यविषयक शिक्षण याद्वारे स्वच्छता कार्यक्रमाची व्यापकता वाढविण्यासाठी मंत्रालयाकडून एकत्रित करण्यात आलेल्या सूचना आणि धोरणात्मक निर्णयांचे संकलन म्हणजेच सुधारित मार्गदर्शक तत्त्वे. संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या क्षेत्र कार्यवाहकांना कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे उपयोगी पडताल अशी मला आशा वाटते.

नवी दिल्ली (राकेश बिहारी)
जानेवारी २९, २००४

## केंद्रिय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम
## (संपूर्ण स्वच्छता अभियान)

### पार्श्वभूमी

१. पिण्याच्या पाण्याची पुरेशी उपलब्धता आणि स्वच्छतेच्या योग्य सवयी यावर वैयक्तिक आरोग्य आणि निरोगी शरीर अवलंबून असते. म्हणूनच पाणी, स्वच्छता आणि आरोग्य याच्यात प्रत्यक्ष संबंध आहे. विकसनशील देशात, पिण्याचे अयोग्य पाणी, मलमूत्राची अयोग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे, पर्यावरणीय अस्वच्छता आणि वैयक्तिक व अन्नपदार्थ खाण्याच्या आरोग्यपूर्ण सवयींचा अभाव यामुळे अनेक रोग पसरतात. भारतही त्याला अपवाद नाही. सध्याच्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या बालमृत्यूचे महत्त्वाचे कारण म्हणजे अस्वच्छता, हे आहे. ग्रामीण भागातील आरोग्याच्या या प्रश्नावर आधारित केंद्रीत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम १९८६ मधे सुरू झाला. याचे प्रमुख उद्दिष्ट ग्रामीण लोकांच्या जीवनाची गुणवत्ता वाढविणे आणि ग्रामीण महिलांना प्रतिष्ठा प्राप्त करून देणे, हे होते.

२. या आधीच्या काळात स्वच्छतेची कल्पना खड्डा मोरी, उघडे खड्डे, शौच खड्डे आणि पाटी संडास याद्वारे मानवी मलमूत्राची विल्हवाट लावणे यापुरती मर्यादित होती. पण आता या अभियानातून अधिक सर्वकष संकल्पना पुढे येत आहे. यामधे द्रव आणि घन कचऱ्याची विल्हेवाट, अन्नपदार्थ खाण्याच्या आरोग्यपूर्ण सवयी, वैयक्तिक, कौटुंबिक आणि पर्यावरणीय आरोग्य यांचाही समावेश होतो. स्वच्छतेची गरज फक्त आरोग्यासाठी नसून वैयक्तिक आणि सामाजिक जीवनमानासाठीही उपयुक्त आहे. जगण्याची गुणवत्ता आणि मानव विकास निर्देशांक यामधे स्वच्छता हा मुलभूत निर्णायक आहे. स्वच्छतेच्या चांगल्या सवयी पाणी आणि मातीचे प्रदूषण आणि त्यापासून होणारी रोगराई थोपवते. अशा प्रकारे वैयक्तिक आरोग्य, घराची स्वच्छता, पिण्यासाठी सुरक्षित पाणी, कचऱ्याची विल्हेवाट लावणे, मलमूत्राचे विसर्जन आणि वाया जाणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन या सर्वांचा समावेश स्वच्छतेच्या सवयीमधे होतो.

३. १९९६-९७ मधे ग्रामीण पाणी पुरवठा आणि स्वच्छता या संदर्भात माहिती, दृष्टिकोन आणि सवयी याविषयी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन यांनी सर्वकष मुलभूत सर्वेक्षण केले. त्यातून असे दिसून आले की, ५५ टक्के खाजगी शौचालय स्वयंप्रेरणेतून बांधले गेले. फक्त २ टक्के लोकांनी मुख्य प्रेरणा म्हणून शासनाची सबसिडी असल्याचे नमूद केले. ५४% लोकांनी स्वतःची सोय व्हावी व आडोसा मिळावा यादृष्टीने शौचालय बांधले. शौचालयांसाठी सुमारे ५१ टक्के लोक स्वतःचे १००० रुपये खर्च करण्यास तयार असल्याचे दिसून आले.

४. वरील गोष्टींचा विचार करून, केंद्रिय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमात सुधारणा करण्यात आल्या. नवीन स्वरूपाच्या या कार्यक्रमात मागणीनुसार हे अभियान चालवले जाईल. संपूर्ण स्वच्छता अभियान या नवीन नावाचे हे अभियान प्रामुख्याने माहिती, शिक्षण आणि प्रसार, मानव संसाधन विकास, क्षमता संवर्धनाची कामे यातून ग्रामीण भागात या विषयाची जाणीव जागृती करणे व स्वच्छतेच्या सोयींसाठी मागणी निर्माण करणे यासाठी चालविले जाईल. यामुळे आपापल्या आर्थिक कुवतीनुसार

योग्य तो तांत्रिक पर्याय निवडण्याची ग्रामस्थांची क्षमता वाढेल. हा कार्यक्रम लोकाभिमुख असेल आणि लोकसहभागाच्या आधारावर राबविला जाईल. नवीन कल्पना समजावून घेणे आणि त्या लोकांपर्यत पोहोचवणे यात मुलांचा सहभाग मोठा असतो. संपूर्ण स्वच्छता अभियानाचे पुरस्कर्ते म्हणून स्वच्छतेच्या चांगल्या सवयी घरात आणि शाळेत रूजविण्यासाठी मुलांना विशेष महत्त्व दिले जाईल. देशातील सर्व शाळा आणि आंगणवाड्यांमधे मुलांकरिता आणि मुलींकरिता स्वतंत्र मुताऱ्या आणि संडास बांधणे, हे या अभियानाचे ध्येय आहे.

**उद्दिष्टे**

५. संपूर्ण स्वच्छता अभियानाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

- देशाच्या ग्रामीण भागातील जीवनमानाची गुणवत्ता उंचावणे.
- देशाच्या ग्रामीण भागात स्वच्छता कार्यक्रमाची व्यापकता वाढविणे.
- जाणीव जागृती आणि आरोग्य विषयक शिक्षण यातून स्वच्छतेच्या सुविधांची मागणी निर्माण करणे.
- देशाच्या ग्रामीण भागातील शाळा आणि अंगणवाड्यातून स्वच्छतेच्या सुविधा निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक शिक्षण देणे व स्वच्छतेच्या सवयी लावणे.
- स्वच्छतेच्या कमी खर्चाच्या आणि योग्य तंत्रांना प्रोत्साहन देणे.
- पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे व अन्नपदार्थांचे प्रदूषण कमी करण्यासाठी उघड्यावर मलमूत्रविसर्जन करण्याच्या पद्धतीचे निर्मूलन करणे.
- पाणी न लागणाऱ्या शौचालयात बदल करणे आणि डोक्यावरुन मैला वाहून नेण्याच्या पद्धतीचे निर्मूलन करणे.

**भूमिका**

६. हे अभियान लोकाभिमुख आणि लोकसहभागावर आधारित करणे, ही यामागची भूमिका आहे. मागणीआधारित अंमलबजावणी हा दृष्टिकोन स्वीकारताना जाणीव जागृती, शाळा व घरातील वापरासाठी स्वच्छतेच्या सोयी आणि स्वच्छ पर्यावरणावर भर दिलेला आहे. समाजाच्या गरजा पुरविण्यासाठी पर्यायी यंत्रणा स्वीकारल्या जातील. प्रत्येक कुटुंबांसाठी वैयक्तिक शौचालयासाठी अनुदान देण्यापेक्षा गरीबातील गरीब कुटुंबाला प्रोत्साहनात्मक बक्षिस म्हणून ते दिले जाईल. ग्रामीण भागात शालेय स्वच्छता कार्यक्रम हा महत्त्वाचा घटक आहे आणि गावकऱ्यांना मोठया प्रमाणात या स्वच्छता कार्यक्रमात सहभागी करुन घेण्यासाठी तो प्राथमिक कार्यक्रमाप्रमाणे आवश्यक आहे. लोकांच्या आणि स्थानिक गरजेप्रमाणे तांत्रिक सुधारणा, माहिती, शिक्षण आणि प्रसारावर आधारित अभियानात पंचायती राज, सहकारी संस्था, महिला मंडळ, बचत गट आणि स्वयंसेवी संस्था यांचा सहभागही अत्यंत आवश्यक आहे. स्वच्छता आणि आरोग्याच्या सवयी सुधारणे आणि त्या सवयींना अनुरूप असणाऱ्या बांधकामाच्या, परवडणाऱ्या आणि उपलब्ध होऊ शकणाऱ्या सुविधा अनेक उपलब्ध तंत्रांमधून निवडून सर्व ग्रामीण स्तरावर स्वच्छता सुविधांच्या योग्य वापरासंबंधात योग्य ते बदल घडवून आणणे, ही या अभियानाची भूमिका आहे.

**अंमलबजावणी**

७. संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी प्रकल्प तत्त्वावर केली जाईल. प्रकल्पाचा प्रस्ताव जिल्हयाकडून तयार केला जाईल, त्याची तपासणी राज्य शासन करेल आणि नंतर तो केंद्र शासनाला सादर केला जाईल. (पेयजल आपूर्ति विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय) सं.स्व.अ.ची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने होते. प्राथमिक माहिती, शिक्षण आणि प्रसारासाठी आवश्यक रक्कम उपलब्ध करून दिली जाते. कामाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होताना आवश्यकता पूर्ण केल्या जातात. त्याप्रमाणे लाभार्थी कुटुंब घरगुती वापराच्या मोरीसाठी यादीतून योग्य ती निवड करतात. निवड यादीतील उपलब्ध तंत्राच्या लवचिकतेमुळे गरीब कुटुंबांना त्यांच्या गरजेप्रमाणे आणि आर्थिक कुवतीप्रमाणे नंतरच्या सुधारणांसाठी संधी मिळेल. या अभियानामधे विविध स्वयंसेवी संस्था / पंचायत राज संस्था / इतर संबंधित संस्था यांच्या सहभागाने स्वच्छता सवयी आणि वापर पद्धतीतील अपेक्षित बदल, स्वच्छता सुविधांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यायी यंत्रणा, योग्य तांत्रिक बारकावे, तांत्रिक मांडणी व गुणवत्ता यांची पूर्तता करण्यासाठी शासन यंत्रणा व इतर लाभार्थी, परिणामकारक माहिती, शिक्षण व संवाद आणि संवादाचा वापर यामध्ये सुसंवाद साधला जाईल.

८. सं.स्व.अ.ची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा हा एक घटक आहे. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी निवडक जिल्हयांसाठी सं. स्व. अ. प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडे मागणी करून त्यांचे सहाय्य मागायचे आहे. एका राज्याला किती प्रकल्प द्यायचे, हे राज्याकडून आलेल्या मागणीवर आणि राज्यातील इतर जिल्हयांत चालू असलेल्या प्रकल्पातील कामाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असेल.

**संपूर्ण स्वच्छता अभियान - घटक आणि कार्य**

९. कार्यक्रमाचे महत्त्वाचे घटक आणि अंमलबजावणीसाठीची कार्य पुढीलप्रमाणे

१) **सुरूवातीची कामे** - स्वच्छता आणि आरोग्याच्या सवयी, लोकांचा त्याकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि स्वच्छतेसाठीच्या सुधारित सोयींसाठीची मागणी याचे मूल्यमापन करणारे सर्वेक्षण सुरवातीलाच करण्यात येईल. केंद्र शासनाकडून सहाय्य मागण्यासाठी या सर्वेक्षणावर आधारित जिल्हास्तरीय संपूर्ण स्वच्छता अभियानाचा आराखडा तयार करण्यात येईल. सुरूवातीच्या कामांमधे मुलभूत सर्वेक्षण, प्रकल्प अंमलबजावणीचा आराखडा, विषयाची पूर्व तोंडओळख करून घेणे, जिल्हा स्तरावरील कार्यक्रम व्यवस्थापकांचे प्रशिक्षण याचाही समावेश असेल. या कामांसाठीचा निधी केंद्र शासनाकडून दिला जाईल आणि ती रक्कम प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ५ टक्क्यांपेक्षा जास्त नसावी.

२) **माहिती, शिक्षण आणि संवाद कामे** (**IEC**) - माहिती, शिक्षण आणि संवाद, हे या कार्यक्रमाचे महत्त्वाचे घटक आहेत. या कामातून ग्रामीण भागात घरगुती, शालेय, आंगणवाडी, बालवाडी आणि सार्वजनिक स्वच्छता सुविधांसाठी मागणी निर्माण होणे अपेक्षित आहे. यामधे होणारी कामे विशिष्ट क्षेत्रासाठी असतील आणि गावातल्या सर्व स्तरांतून शौचालय बांधण्यासाठीची मानसिकता त्यातून तयार होईल. अशा कामासाठी लोकांना प्रोत्साहन आणि प्रेरणा देणाऱ्यांना या

रकमेतून मानधन देता येईल. हे मानधन त्याच्या कार्यक्षमतेवर आधारित असेल आणि किती कुटुंबाना आणि शाळा / अंगणवाडी येथे शौचालय व शोषखड्डे बांधण्यासाठी आणि त्याचा वापर करण्यासाठी त्यानी लोकांना प्रवृत्त केले, यावर त्यांची कार्यक्षमता तपासली जाईल. माहिती, शिक्षण आणि प्रसारामध्ये आरोग्य आणि स्वच्छतेच्या सवयी आणि पर्यावरणाची स्वच्छता यावर भर असेल. माहिती, शिक्षण आणि प्रसारात सार्वजनिक इमारतीच्या भिंतीवर चित्रांकन किंवा भित्तीचित्र यातून पंचायतींनी हाती घेतलेल्या कामाचे तपशील लोकांपर्यंत पोहचवावेत. ग्रामीण स्तरावरून मागणी निर्माण होण्यासाठी आकाशवाणी, दूरदर्शन आणि केबलच्या माध्यमातून दृक्-श्राव्य साधनांची निर्मिती करता येईल. यासाठी लागणारा निधी केंद्र शासन आणि राज्य शासन यांकडून ८०:२० या प्रमाणात देण्यात येईल. या कामांसाठीचा निधी एकूण प्रकल्प खर्चाच्या १५ टक्के पेक्षा कमी असू नये. प्रत्येक जिल्हयाने समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचण्यासाठी धोरण निश्चित केलेला सविस्तर माहिती, शिक्षण व संवाद कृती आराखडा तयार करावयाचा आहे. आरोग्यपूर्ण सवयी हा ग्रामीण जनतेच्या जीवनाचा एक भाग होण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि या कार्यक्रमांतर्गत विकसित केल्या जाणाऱ्या सुविधांची देखभाल दुरूस्ती ग्रामस्थांनी करणे, हा या संवाद कृती आराखड्याचा प्रमुख हेतू आहे.

या कामासाठी उपलब्ध असणारा निधी गावकऱ्यांना आणि गावातील शाळकरी मुलांना आरोग्य विषयक शिक्षण देण्यासाठी वापरला जावू शकतो.

३) **ग्रामीण स्वच्छता साधनसामुगी दुकाने (Rural Sanitary Marts) आणि निर्मिती केंद्र (Production Centres)** - स्वच्छतेच्या वैयक्तिक, कौटुंबिक आणि पर्यावरणीय सुविधा निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या सामुग्रीची विक्री स्वच्छता साधनसामुग्री दुकानांतून केली जाईल. स्वच्छता सुविधा तयार करण्यासाठी लागणारी सर्व सामुग्री आणि साधने या दुकांनामधे असावीत. हा सामाजिक उद्दिष्ट असणारा उद्योग आहे. स्थानिक गरजा आणि आर्थिक परिस्थिती यानुसार उपलब्ध असणाऱ्या विविध तांत्रिक पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून त्यासाठी लागणारी साधनसामुग्री व सेवा पुरविणे आणि इतर मार्गदर्शन करणे, हे या ग्रामीण स्वच्छता साधनसामुग्री दुकानांचे मुख्य उद्दीष्ट आहे. निर्माण केंद्रांतून कमी खर्चाच्या आणि परवडणाऱ्या किंमतीच्या सुविधांची सामुग्री तयार करण्यात येईल. स्वयंसेवी संस्था / बचत गट / महिला मंडळ / पंचायत यापैकी कोणीही असे दुकान किंवा निर्मिती केंद्र चालवू शकतात. यासाठी ५ टक्क्यांपेक्षा कमी आणि जास्तीत जास्त रु. ३५ लाख एवढा निधी दुकान अथवा निर्मिती केंद्रासाठी देण्यात येईल. हा निधी केंद्र शासन आणि राज्य शासन यांकडून ८०:२० या प्रमाणात देण्यात येईल. संपूर्ण स्वच्छता अभियाना अंतर्गत एक दुकान / निर्मिती केंद्रासाठी जास्तीत जास्त रु. ३.५ लाख देण्यात येतील. हा निधी स्वयंसेवी संस्था / बचत गट / महिला मंडळ / पंचायत किंवा इतर संस्था यांना असे स्वच्छता साधनसामुग्री दुकान / निर्मिती केंद्र बनविण्यासाठी देता येईल. हा निधी शेड उभारणी, गवंडी काम करणाऱ्यांचे प्रशिक्षण आणि फिरता निधी यासाठी देण्याची तरतूद या प्रकल्पामधे आहे. या कामामधे स्थैर्य आल्यानंतर फिरता निधी हा जिल्हा अंमलबजावणी यंत्रणेस परत करायचा आहे. ग्रामीण स्वच्छता साधनसामुग्री दुकान आणि निर्मिती केंद्राच्या व्यवस्थापकांना

प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण संस्था आणि प्रशिक्षक हे जिल्हा अंमलबजावणी यंत्रणेने निश्चित करायचे आहेत. या प्रकल्पाच्या उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी या ग्रामीण स्वच्छता साधनसामुग्री दुकानांचे आणि निर्मिती केंद्रांचे काम चालू आहे किंवा नाही याचे मूल्यमापन जिल्हा अंमलबजावणी यंत्रणा आणि ग्रामीण स्वच्छता साधनसामुग्री दुकान व निर्मिती केंद्र यांनी मिळून करायचे आहे. तसा करार त्या दोघांमध्ये असेल.

४) **कुटुंबासाठी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम** - योग्य प्रकारे बांधून पूर्ण असलेल्या घरासाठी प्राथमिक कमी खर्चाचे शौचालय (भिंती नसलेले) असावे. ग्रामीण भागात अस्तित्त्वात असलेल्या सगळया पाणी न लागणाऱ्या शौचालयाचा पाणी लागणाऱ्या शौचालयात बदल करणे, ग्रामीण भागातील सर्व कुटुंबे या कार्यक्रमात सहभागी करुन घेणे, हे या कार्यक्रमाचे उद्दीष्ट आहे. संपूर्ण गावाचा सहभाग मिळण्यासाठी, या कार्यक्रमामधे दिला जाणारा प्रोत्साहन निधी गरज वाटत असल्यास दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठीही वापरता येईल. हे बांधकाम दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांनी स्वतःच करायचे असून बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, त्याचा योग्य तो वापर या कुटुंबाने केल्यानंतर त्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन म्हणून निधी देता येईल. वैयक्तिक शौचालय बांधकामासाठीच्या प्रोत्साहन निधीचा आर्थिक आराखडा पुढीलप्रमाणे :

| **प्राथमिक कमी खर्चाच्या प्रकाराची किंमत (रुपये)** | **आर्थिक विभागणी** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **केंद्र शासन** | | **राज्य शासन** | | **कुटुंब** | |
| | दारिद्र्य रेषे खालील | दारिद्र्य रेषे वरील | दारिद्र्य रेषे खालील | दारिद्र्य रेषे वरील | दारिद्र्य रेषे खालील | दारिद्र्य रेषे वरील |
| रू. ६२५/- पर्यंत (एका खड्ड्यासाठी) | ६० % | - | २० % | - | २० % | १०० % |
| रू. ६२५/- ते रू. १०००/- पर्यंत | ३० % | - | ३० % | - | ४० % | १०० % |
| रू. १०००/- पेक्षा जास्त | - | - | - | - | १०० % | १०० % |

केंद्र शासना कडून दिला जाणारा प्रोत्साहन निधी वरील तक्त्यात दिलेल्या प्राथमिक कमी खर्चाच्या प्रकाराच्या शौचालयासाठी ग्राह्य आहे आणि कोणत्याही परिस्थितीत केंद्राकडून मान्यता मिळालेल्या प्रोत्साहन निधीच्या रकमेपेक्षा जास्त निधी दिला जाणार नाही.

या कामाला प्रोत्साहन मिळाल्यामुळे दारिद्र्य रेषेवरील कुटुंब स्वयंस्फूर्तीने वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करतील अशी अपेक्षा आहे. माहिती, शिक्षण आणि प्रसार कार्यक्रमात जिल्ह्यातील सर्व कुटुंबांचा समावेश असेल. याला कोणताही अपवाद असणार नाही.

ग्रामीण भागामधे पाणी न लागणाऱ्या शौचालयाच्या बांधकामास परवानगी दिली जाणार नाही. जर पाणी न लागणारी काही शौचालये अस्तित्त्वात असतील तर ते पाणी लागणाऱ्या शौचालयात रुपांतरित करण्यात यावीत आणि त्याचा खर्च आणि खर्चाची विभागणी ही सहभागी वैयक्तिक कौटुंबिक शौचालयाप्रमाणेच असेल.

५) **सार्वजनिक स्वच्छतागृहे** - संपूर्ण स्वच्छता अभियानात सार्वजनिक स्वच्छतागृह हा महत्त्वाचा घटक आहे. सार्वजनिक स्वच्छतागृह गावातील पुरूष, महिला आणि भूमिहीन कुटुंबांना जाण्याच्या व वापराच्या दृष्टीने सोयीच्या ठिकाणी असले पाहिजे. या स्वच्छतागृहांची देखभाल दुरूस्ती फार महत्त्वाची असून त्याची अंतिम जबाबदारी ग्राम पंचायतीने घ्यावयाची आहे किंवा त्यासाठी गावपातळीवर पर्यायी व्यवस्था करावयाची आहे. सार्वजनिक स्वच्छतागृहासाठी जास्तीत जास्त २ लाख रुपये एवढी रक्कम मान्य केलेली आहे. पण याचे तपशीलवार चित्रांकन आणि आराखडा सादर केल्यानंतर राष्ट्रीय योजना मान्यता समितीकडून त्याला मान्यता दिली जाईल. यातील खर्चाची विभागणी केंद्र शासन, राज्य शासन आणि गावाकडून ६०:२०:२० याप्रमाणात केली जाईल. लोकवर्गणीची रक्कम गावकऱ्यांऐवजी ग्रामपंचायतदेखील भरु शकते. यासाठी होणाऱ्या खर्चाला कुठलीही मर्यादा नाही. पण केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या रकमेच्या ६० टक्के एवढाच खर्च सार्वजनिक स्वच्छतागृह आणि वैयक्तिक शौचालयासाठी झाला पाहिजे. सर्वसाधारणपणे ज्या गावांमधे वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसेल आणि गावातील लोकच देखभाल दुरूस्तीची जबाबदारी घेण्यास तयार असतील तरच सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधली जावीत. या कार्यक्रमाचा मुख्य भर ग्रामीण जनतेला आरोग्य विषयक सवयीचे शिक्षण देणे आणि वैयक्तिक शौचालय बांधणे यावर आहे आणि जेथे वैयक्तिक शौचालय बांधणे शक्य नसेल तेथेच सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधली जावीत. गावात सार्वजनिक ठिकाणी तसेच जेथे बाजारासारख्या ठिकाणी जिथे खूप लोक एकत्र येतात, अशा जागी सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधता येतील.

६) **शालेय स्वच्छता आणि आरोग्यविषयक शिक्षण** - लहान मुले नवीन कल्पना स्विकारायला अधिक मोकळी असतात. उघड्यावर शौचास बसू नये यासाठी लहान मुलांची मानसिकता बदलण्यासाठी लागणारे प्रोत्साहन व त्याविषयीचे शिक्षण देण्यास शाळा/ आंगणवाडी ही योग्य माध्यमे आहेत. शाळेत शिक्षकांकडून मिळालेले स्वच्छतेचे धडे मुले अंगिकारतील आणि ते सहजच पालकांपर्यंत जाऊन पोहोचतील. त्यामुळे पालकांच्या मानसिकतेतही बदल होऊन तेदेखील स्वच्छतेच्या चांगल्या सवयी स्विकारतील. त्यामुळे शालेय स्वच्छता हा संपूर्ण स्वच्छता अभियानाचा फार महत्त्वाचा घटक आहे. शासकीय प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये आणि अंगणवाडयांमध्ये स्वच्छतागृहे बांधली जावीत. शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधण्यावर भर दिला जावा. रु. २०,००० किंमतीच्या प्रत्येक स्वच्छतागृहासाठी केंद्र शासनाकडून रु. १२,००० पर्यंत मदत केली जाई. मुले आणि मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधायची असून ती दोन स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधली जातील आणि त्यासाठी केंद्र शासनाकडून प्रत्येकी रु. १२,०००/- पर्यंतचे सहाय्य मिळेल. शालेय स्वच्छतागृहांसाठीचा निधी केंद्र शासन, राज्य शासन आणि शिक्षक-पालक संघ यांच्याकडून उभारण्यात येईल आणि

त्याची विभागणी ६०:३०:१० याप्रमाणात करण्यात येईल. शिक्षक-पालक यांच्या वर्गणीचा १० टक्के भार ग्राम पंचायत उचलू शकते. वरील विभागणी पेक्षा जास्त रक्कम राज्य शासन / केंद्र शासित प्रदेश, शिक्षक-पालक संघ आणि पंचायतींकडून जमा करता येऊ शकते.

स्वच्छतागृहांच्या बांधकामाबरोबरच आरोग्य विषयक सर्व माहिती मुलांना देणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेतील किमान एका शिक्षकाला आरोग्यविषयक बाबींचे प्रशिक्षण देण्यात यावे. त्या शिक्षकाने मुलांमध्ये आवड निर्माण होईल, अशा मनोरंजक पद्धतीने आणि काही सामाजिक प्रशिक्षणाद्वारे त्यांना चांगल्या आरोग्यविषयक सवयींचे प्रशिक्षण दिले पाहिजे. माहिती, शिक्षण आणि संवादासाठी दिलेल्या निधीतूनच यासाठीच्या रक्कमेची तरतूद केली जाईल.

**अंगणवाडी स्वच्छतागृहे** - मुलांना अगदी लहानपणापासून चांगल्या सवयी लावण्यासाठी अंगणवाडी हे माध्यम उपयुक्त आहे. तिथे येणाऱ्या मुलांच्या आईमध्येही चांगला बदल घडवून आणण्यासाठी हे शिक्षण उपयोगी आहे. हे उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी प्रत्येक आंगणवाडीत लहान मुलांच्या सोयीचे स्वच्छतागृह बांधले जावे. ग्रामीण भागात प्रत्येक आंगणवाडी किंवा बालवाडीमध्ये स्वच्छतागृह बांधण्याचा खर्च रु. ५,०००/- पर्यंत असावा. त्यामधे केंद्र शासनाकडून रु. ३,०००/- पर्यंतची मदत करण्यात येईल. अतिरिक्त खर्च राज्य शासन किंवा पंचायतीकडून केला जाईल. खाजगी स्वरूपाच्याही अनेक आंगणवाड्या चालत असल्यामुळे त्यांच्याबाबतीत पुढील भूमिका असावी.

१. शासकीय इमारतींमधे भरणाऱ्या अंगणवाडी / बालवाडीला संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत दिल्या जाणाऱ्या रकमेतून निधी उपलब्ध करून द्यावा.
२. खाजगी इमारतीत चालणाऱ्या अंगणवाडी / बालवाडीच्या मालकानी, आराखड्याप्रमाणे लहान मुलांना योग्य असे स्वच्छतागृह बांधावे आणि बांधकामाचा खर्च इमारतीच्या वाढीव भाडेपट्टीतून वसूल करावा. ही स्वच्छतागृहे संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत बांधली जावू शकतात. आणि मालकाला दर महिन्याला दयावयाच्या भाड्यातून त्याच्या रकमेची परतफेड करण्यात यावी.
३. अंगणवाडी/बालवाडीसाठी नवीन जागा भाड्याने घेतानाच, जिथे लहान मुलांसाठीच्या स्वच्छतागृहाची सोय असेल अशीच जागा भाड्याने घ्यावी. केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या एकूण निधीच्या १० टक्केपेक्षा जास्त निधी शालेय स्वच्छतागृहे आणि आंगणवाडी शौचालयासाठी वापरला जावा.

७) **प्रशासकीय खर्च** - प्रशासकीय खर्चामधे प्रशिक्षण, प्रकल्प काळासाठी घेतलेल्या तात्पुरत्या स्वरूपाच्या कर्मचाऱ्यांचे पगार, सहाय्यभत सेवा, इंधन, भाड्याने वापरलेली वाहने, स्टेशनरी, प्रकल्पाचे संनियंत्रण व मूल्यमापन इ. बाबींचा समावेश असेल. पण संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीसाठी कुठल्याही प्रकारचे अतिरिक्त पद निर्माण केले जाउ नये. तसेच यासाठी वाहन खरेदी करु नये. व्यावसायिक रित्या प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्पाच्या कालावधीत संवाद, मानव संसाधन विकास, शालेय स्वच्छता आणि आरोग्य विषयक शिक्षण आणि संनियंत्रणाच्या कामांसाठी स्वतंत्र सल्लागार नियुक्त करता येतील. त्याचे मानधन

प्रशासकीय खर्चातून देता येईल. प्रशासकीय खर्चातून वाहन खरेदी इ. सारखे व्यवहार करता येणार नाहीत. ४ मार्च २००३ रोजी काढलेल्या No. W–11013/4/2000-CRSP पत्रकाद्वारे प्रशासकीय खर्चात करावयाचे आणि न करावयाचे खर्च स्पष्ट करण्यात आले आहेत. त्याची अंमलबजावणी सारासार विचार करून करावयाची आहे. त्याची एक प्रत परिशिष्ट ११ मधे जोडली आहे. प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे संगणक आणि त्यासाठी आवश्यक इतर साधनांची खरेदी करता येईल.

**राष्ट्रीय योजना मान्यता समिती (NSSC)**

१०. राज्य शासन आणि केंद्रशासित प्रदेशाकडून आलेल्या निवडक जिल्ह्यातील प्रकल्प प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी राष्ट्रीय योजना मान्यता समितीची स्थापना करण्यात आली. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या पेयजल आपूर्ति विभागाचे सचिव या समितीचे अध्यक्ष असतील. या समितीचे एकूण सहा सदस्य असतील आणि दोन सदस्य केंद्र शासनाच्या अतिरिक्त सचिव आणि आर्थिक सल्लागार आणि सहसचिव असे अधिकारी असतील. ग्रामीण स्वच्छता क्षेत्रात कार्यरत असणारे ४ तज्ज्ञ शासकीय अधिकारी नसतील.

**विशेष व्यवस्था**

११. दुर्बल आणि मागासलेल्या घटकांचा समावेश या प्रकल्पात व्हावा यासाठी जिल्हा, तालुंका गावे आणि लोकांकडून स्वच्छतागृहासाठी झालेली मागणी यातून मागास जाती आणि मागास जमातींना प्राधान्य देण्यात यावे. कौटुंबिक शौचालयासाठी दिल्या जाणाऱ्या मानधनातून किमान २५ टक्के मानधन मागास जाती आणि मागास जमातींना दिले जावे.

१२. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधल्याबद्दल दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनपर रकमेतून ३ टक्के मानधन अपंगासाठी राखीव असावे. शाळा आणि इतर संस्थांमधे बांधल्या जाणाऱ्या शौचालयात अपंगांसाठीच्या सोयी आणि सुविधा असाव्यात.

**प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा**

१३. संपूर्ण स्वच्छता अभियानात जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदेकडून अंमलबजावणी होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सामाजिक चळवळ करण्याची आवश्यकता आहे. जर जिल्हा परिषद कार्यरत नसेल तर जिल्हा पाणी आणि स्वच्छता समितीद्वारे प्रकल्प राबविला जाईल. संपूर्ण स्वच्छता अभियान आणि स्वजलधारा या दोन्ही प्रकल्पांची अंमलबजावणी एकाच यंत्रणेमार्फत होईल.

१४. प्रकल्प संनियंत्रणासाठी आणि जिल्हयांना संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीस पूरक मदत करण्यासाठी योग्य यंत्रणा राज्य पातळीवर राज्य शासनाकडून उभी केली जाईल. ज्या राज्यात पाणी पुरवठा आणि स्वच्छतेची कामे दोन वेगळया विभागांकडून केली जातात तिथे स्वतंत्र संस्थात्मक संस्थीय रचना तयार करण्यात येईल आणि पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्याच्या संपर्कातून ही रचना काम

करेल. संवाद, मानव संसाधन विकास, संनियंत्रण आणि शालेय स्वच्छता व आरोग्यविषयक शिक्षण या क्षेत्रातील सल्लागारांची नियुक्ती राज्य स्तरावर केली जाईल. त्यासाठीचा निधी केंद्र शासन आणि राज्यांकडे उपलब्ध असणारा मानव संसाधन विकास निधी यातून ७५:२५ याप्रमाणात विभागला जाईल. त्याचप्रमाणे संपूर्ण राज्यासाठी माहिती, शिक्षण आणि संवाद व मानव संसाधन विकासाची काही सारखी कामे एकत्रितपणे राबविता येतील. त्यासाठी राज्यांना ७५:२५ याप्रमाणात मर्यादित निधी उपलब्ध केला जाईल. या कार्यक्रमासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँकेत स्वतंत्र खाते उघडले पाहिजे.

## पंचायती राज संस्थेची भूमिका

१५. घटनेच्या ७३ व्या दुरूस्ती प्रमाणे, स्वच्छता हा विषय ११ व्या कलमामध्ये येतो. त्यानुसार संपूर्ण स्वच्छता अभियानामध्ये ग्राम पंचायतींची भूमिका महत्त्वाची आहे. संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी पंचायती राज संस्थेच्या सर्व स्तरांवरून केली जाईल. स्वच्छतागृहांच्या बाधकामासाठी आणि कचऱ्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करून पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठीची सामाजिक चळवळ पंचायची राज कडून करण्यात येईल. सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या बांधकामाची देखभाल दुरूस्ती पंचायत / स्वयंसेवी संस्था / धर्मादायी विश्वस्त संस्था यांच्याकडून केली जाईल. शालेय शौचालयाच्या बाधकामासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या निधीमधे लागणारा जास्तीचा निधी पंचायत स्वतःच्या उत्पन्नातून उभा करू शकते. संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत बांधण्यात आलेले सार्वजनिक स्वच्छतागृहे, पर्यावरणाचे घटक, गटारे याच्या बांधकामाच्या रक्षणाची तसेच देखभाल दुरूस्तीची जबाबदारीही पंचायत संस्थांकडेच आहे. पंचायत ग्रामीण स्वच्छता साधनसामुग्री दुकान / निर्माण केंद्र उघडून चालवू शकते.

## स्वयंसेवी संस्थांची भूमिका

१६. ग्रामीण भागात संपूर्ण स्वच्छता अभियान अंमलबजावणीमधे स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. माहिती, शिक्षण व संवाद त्याचबरोबर प्रत्यक्ष बांधकाम यासारख्या सर्वच कामांमधे त्यांचा सहभाग असेल. ग्रामीण भागात स्वच्छता व आरोग्यविषयक जाणीव जागृती करून मागणी निर्माण करणे याबरोबरच स्वच्छतागृहाचा योग्य वापर होणे, यामधे स्वयंसेवी संस्थाचा वाटा मोठा असेल. ग्रामीण स्वच्छता साधनसामग्री दुकान / निर्माण केंद्र स्वयंसेवी संस्था सुद्धा चालवू शकतात. प्राथमिक सर्वेक्षण आणि ग्रामीण लोकसहभागीय मूल्यमापनातून लोकांची प्रवृत्ती समजून घेणे आणि स्वच्छता, आरोग्य, पाण्याचा वापर आणि देखभाल व दुरूस्ती यासंदर्भातील लोकांच्या कल्पना समजावून घेणे इ. मध्ये स्वयंसेवी संस्थाना सहभागकरुन घेता येईल. या संस्थाची निवड अत्यंत पारदर्शी पद्धतीने केली जाईल.

**प्रकल्पाचा निधी**

१७. संपूर्ण स्वच्छता अभियान प्रकल्पात मान्य झालेल्या एकूण निधीची घटकवार विभागणी तसेच प्रत्येक घटकासाठीचा केंद्र शासन, राज्य शासन आणि लाभार्थी यांचा हिस्सा पुढील तक्त्यात दिला आहे.

**तक्ता**

| **क्र.** | **घटक** | **प्रकल्पाच्या एकूण निधीचे घटक** | **विभागणी (%)** | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **केंद्र शासन** | **राज्य शासन** | **लाभार्थी/ कुटुंब / समाज** |
| १ | सुरूवातीची कामे (प्राथमिक सर्वेक्षण, कार्यक्रमाची प्रसिद्धी इ.) | ५% पेक्षा कमी (प्रत्येक जिल्ह्यासाठी जास्तीत जास्त २० लाख रुपये) | १०० | ० | ० |
| २ | माहिती, शिक्षण आणि संवाद | १५ % पेक्षा जास्त | ८० | २० | ० |
| ३ | ग्रामीण स्वच्छता साधन सामुग्री दुकाने आणि निर्माण केंद्र | ५% पेक्षा जास्त (प्रत्येक जिल्ह्यासाठी जास्तीत जास्त ३५ लाख रुपये) | ८० | २० | ० |
| ४ | • वैयक्तिक शौचालये (दारिद्र्यरेषेखालील / अपंगासाठी )<br>• सार्वजनिक स्वच्छतागृहे | ६० % पेक्षा कमी (९ (४ ) मधील तत्त्वांनुसार) | ६० | २० | २० |
| ५ | दारिद्र्य रेषेवरील कुटुंबासाठीची वैयक्तिक शौचालय | - | ० | ० | १०० |
| ६ | आंगणवाडी व शालेय स्वच्छतागृहे (बांधकाम आणि सहाय्य सेवा) | १०% पेक्षा जास्त | ६० | ३० | १० |
| ७ | प्रशासकीय खर्च (प्रशिक्षण, सहाय्य सेवा, संनियंत्रण व मूल्यमापन) | ५% पेक्षा कमी (प्रत्येक जिल्ह्यात जास्तीत जास्त ४० लाख रुपये) | ८० | २० | ० |

१८. नियोजित रकमेपेक्षा कुठल्याही घटकासाठी कमी रक्कम प्राप्त झाली असेल किंवा कमी रक्कम वापरली गेली असेल तर उरलेली रक्कम वैयक्तिक शौचालये बांधण्यासाठी वापरता येईल. पण कोणत्याही परिस्थितीत प्रकल्पाच्या एकूण निधीच्या ५ टक्के पेक्षा जास्त रक्कम प्रशासकीय खर्च आणि सुरूवातीच्या कामांसाठी वापरता येणार नाही.

**निधी वितरण**

१९. प्रकल्प अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना केंद्राकडून मिळणारे सहाय्य चार हप्त्यात वितरित करण्यात येईल. (३०, ३०, ३०, १०) जिल्हा स्तरावर अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेचे आणि बँक खात्याचे तपशील यासह प्रस्ताव तयार झाल्यावर राष्ट्रीय योजना मान्यता समिती कडून प्रस्तावाला मान्यता मिळताच पहिला हप्ता दिला जाईल. पुढील हप्ते देताना खालील अटींची पूर्तता करावी लागेल.

१. राज्याचा हिस्सा वितरित होणे - केंद्र शासनाकडून वितरित केलेल्या रकमेच्या प्रमाणात पंधरा दिवसात राज्य शासनाचा हिस्सा वितरित झाला पाहिजे.

२. कौटुंबिक वाटा आणि लोकवर्गणी- बांधकामासाख्या कामांसाठी असलेला दारिद्र्य रेषखालील व दारिद्र्यरेषे वरील कुटुंबांची वर्गणी गोळा करुन मासिक प्रगती अहवालात त्याची नोंदणी करावी.

३. निधीच्या खर्चाचे आणि वापराचे प्रमाणपत्र - केंद्र तसेच राज्य शासनाकडून मिळणाऱ्या एकूण उपलब्ध निधी आणि त्यावरील व्याजाच्या रकमेच्या किमान ६० टक्के निधीचा योग्य वापर झालाच पाहिजे. केंद्र आणि राज्याकडून मिळणाऱ्या निधीचा वापर स्वतंत्रपणे ६० टक्क्यांपेक्षा जास्त असला पाहिजे. केंद्राकडून मिळालेला निधी आणि राज्याकडून मिळालेल्या निधीच्या वापराचे स्वतंत्र प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे. ज्या वर्षी प्रकल्पाला मान्यता मिळाली आणि निधी प्राप्त झाला त्यावर्षीपासून दर वर्षाचे निधीच्या वापराचे प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे. सर्व निधीच्या वापराच्या प्रमाणपत्रांवर अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अध्यक्ष, जिल्हा पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंडळ / जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा / जिल्हाधिकारी किंवा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यापैकी संबंधित व्यक्तीची प्रति स्वाक्षरी असली पाहिजे. (पहा परिशिष्ट १०)

४. लेखा प्रमाणपत्र - संपूर्ण स्वच्छता अभियान प्रकल्पांचे वार्षिक लेखा परीक्षण अधिकृत लेखापालाकडून केलेले असावे. पुढील हप्त्याच्या वितरणासाठीचा प्रस्ताव सादर करताना त्याआधीच्या आर्थिक वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल सादर करावा लागेल. त्यावर अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अध्यक्ष / जिल्हा पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंडळ / जिल्हाधिकारी किंवा जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यापैकी संबंधित व्यक्तीची प्रति स्वाक्षरी असली

पाहिजे. जर एकाच वर्षात दोन हप्त्यांसाठी मागणी केली असेल, तर ज्या कालावधीपर्यंतचे निधी वापर प्रमाणपत्र सादर केले असेल तिथपर्यंतच्या आर्थिक वर्षाचे हिशोब सादर केले पाहिजेत. लेखापालाने दिलेल्या लेखा अहवालामधे परिशिष्ट ३ आणि ४ मधे दिलेल्या बांबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यासाठीचे प्रप्रत्र परिशिष्ट ५ ते ९ मध्ये दिलेले आहे.

५. मान्यता नसलेल्या बाबींची खरेदी न केल्याचे प्रमाणपत्र - संपूर्ण स्वच्छता अभियानांर्तगत मान्य असलेल्या आणि मान्य नसलेल्या बांबींची यादी संबंधित विभागाच्या No. W-110113/4/2000-crsp दि. ४ मार्च २००३ च्या पत्रानुसार स्पष्ट करण्यात आली आहे. (पहा परिशिष्ट ११) या यादीतील कुठल्याही बाबीचे उल्लंघन न केल्याचे प्रमाणपत्र अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अध्यक्ष / जिल्हा पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंडळ / जिल्हाधिकारी किंवा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यापैकी संबंधित व्यक्तीने प्रति स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

६. दुसऱ्या किंवा पुढील हप्त्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेमार्फत राज्य शासनाच्या ग्रामीण स्वच्छता विषयाशी निगडीत संबंधित प्रशासकीय विभागान्वये पाठवावा.

७. प्रकल्पासाठी मिळालेल्या एकूण निधीच्या कमीत कमी ८० टक्के निधी (केंद्र आणि राज्य शासनाचा निधी स्वतंत्रपणे) वापरला गेला असेल आणि निधी वापर प्रमाणपत्र, AG प्रमाणपत्र, आधीच्या वर्षीचे लेखा प्रमाणपत्र इ. सादर केलेली असतील तर शेवटचा हप्ता वितरित केला जाईल.

८. इतर अटी वेळोवेळी कळविल्या जातील.

**प्रकल्प निधीवर मिळालेल्या व्याजाचा वापर**

२०. संपूर्ण स्वच्छता अभियानाचा प्रकल्प निधी (केंद्र, राज्य आणि लाभार्थी / पंचायत) स्वतंत्र बॅंक खात्यात जमा करावा. त्यावर मिळणारे व्याज या अभियानाच्या साधनांचा एक भाग गणला जाईल. या व्याजाचा वापर जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा माहिती, शिक्षण आणि संवादाच्या जास्तीच्या कामांसाठी करू शकेल. पण कार्यक्रमात सांगितलेल्या आर्थिक मर्यादेत तो खर्च असला पाहिजे. तसेच बांधकामासारख्या कामांसाठीही या व्याजाचा वापर करता येईल, पण मार्गदर्शक सूचनांचे पालन करून प्रत्येक जिल्ह्याला दिलेल्या मर्यादेतच हाही खर्च करावयाचा आहे. जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेला पुढील हप्त्याच्या मागणी बरोबर मिळालेल्या निधीच्या वापराचे जे प्रमाणपत्र सादर करायचे आहे, त्यात या व्याजाच्या वापराचाही समावेश असला पाहिजे.

**देखभाल दुरूस्ती**

२१. स्वच्छतागृहांच्या योग्य वापरासाठी आणि देखभाल दुरूस्तीसाठी गावांमधे आणि कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. घरांसाठी दिलेल्या वैयक्तिक शौचालयाच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च त्या त्या कुटुंबाने करावयाचा आहे. सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च पंचायत / स्वयंसेवी संस्था / धर्मादायी विश्वस्त संस्था / बचत गट करु शकतात. हा खर्च वसूल करण्यासाठी स्वच्छतागृह चालवणाऱ्या आणि त्याची देखभाल करणाऱ्या संस्थांनी त्याचा वापर करणाऱ्या लाभार्थींकडून योग्य मूल्य घ्यावे. शाळा आणि आंगणवाडीतील स्वच्छतागृहांच्या देखभाल दुरूस्तीसाठी संबंधित विभागांनी निधी पुरवायचा आहे.

**परीक्षण**

२२. कार्यक्रमाची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी राज्य आणि जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांकडून नियमित पाहणी दौऱ्यातून परीक्षण होणे आवश्यक आहे. नियमांप्रमाणे बांधकाम झाले आहे का, गावातील लोकांचा त्यात सहभाग आहे का, स्वच्छतागृहांमुळे पाण्याचे स्त्रोत दूषित होत नाहीत ना तसेच लाभार्थींची निवड योग्य पद्धतीने झाली आहे का आणि ते स्वच्छतागृहांचा वापर योग्य पद्धतीने करतात का या गोष्टी अधिकाऱ्यांकडून तपासल्या जातील. या परीक्षणातून स्वच्छतागृहाचा वापर इतर गोष्टींसाठी केला जात नाही ना हेही तपासले जाईल. याव्यतिरिक्त संपूर्ण स्वच्छता अभियानाची माहिती ग्राम पंचायतीने भित्तिचित्र इ. माध्यमांतून पारदर्शी पद्धतीने लोकांसमोर मांडली आहेत का याचीही तपासणी केली जाईल. प्रकल्प अधिकाऱ्यांनी जिल्हा स्तरावर वेगवेगळ्या तालुक्यातील प्रकल्प अंमलबजावणीचा नियमितपणे आढावा घेऊ शकेल अशा तज्ज्ञांचा एक गट तयार करावा. तीन महिन्यातून कमीत कमी एकदा हा आढावा घेतला जावा. याचप्रकारे राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्याचा तीन महिन्यातून एकदा आढावा घ्यावा. याशिवाय प्रकल्प अंमलबजावणीचे गुणवत्ता मूल्यमापन करण्यासाठी केंद्र शासन राज्यांचा आढावा घेईल.

**प्रकल्पातील सुधारणा**

२३. हा कार्यक्रम राबविताना प्राथमिक सर्वेक्षणानुसार वेगवेगळ्या प्रकारच्या बांधकामासाठी काही बदल करावे लागतील. त्यामुळे प्रकल्पामधे त्याप्रमाणे सुधारणा करणे आवश्यक ठरेल. योग्य ती तपासणी केल्यानंतर आणि पेयजल आपूर्ति विभागाकडून त्याप्रमाणे पुनर्रचना झाल्यानंतरच सुधारणांना परवानगी देण्यात येईल. ही बाब योग्य त्या तपासणीसाठी राष्ट्रीय योजना मान्यता समिती पुढे मांडण्यात येईल.

**अहवाल**

२४. प्रकल्प प्रमुखांनी आणि राज्य शासन / केंद्रशासित प्रदेशांनी भारत सरकारला पुढील अहवाल सादर करावयाचे आहेत.

- चालू महिन्याचा मासिक प्रगती अहवाल पुढील महिन्याच्या २० तारखेला सादर करावयाचा आहे. (पहा परिशिष्ट १)
- चालू वर्षातल्या प्रगतीचा एकत्रिक वार्षिक अहवाल पुढील वर्षाच्या ३० एप्रिल पर्यंत सादर करावयाचा आहे. (पहा परिशिष्ट २)

● वित्तीय वर्षाच्या सहामहीत एकदा पाणी न लागणाऱ्या शौचालयांचा पाणी लागणाऱ्या शौचालयात बदल केल्याचे कळविले पाहिजे.

**मूल्यमापन**

२५. संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीबाबत राज्य शासन / केंद्रशासित प्रदेश यांनी काही कालावधीनंतर वेळोवेळी मूल्यांकन करावे. मान्यवर संस्थाकडून हे मूल्यांकन करून घेता येईल. राज्य शासन / केंद्रशासित प्रदेश यांनी केलेल्या ह्या मूल्यांकनाच्या अहवालाच्या प्रती केंद्र शासनास सादर कराव्यात. राज्य शासन / केंद्रशासित प्रदेश यांनी केलेल्या मूल्यांकनाच्या तसेच त्यानंतर केंद्र शासनाने केलेल्या मूल्यांकनाच्या आधारे योग्य त्या दुरूस्त्यांची कार्यवाही प्रकल्पात करावी. मूल्यमापनासाठीचा खर्च या अभियानांर्गत असलेल्या मानव संसाधन विकास निधीतून घेतला जावा.

२६. एका राज्यातील संपूर्ण स्वच्छता अभियानातील प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा केंद्र शासनाकडून वर्षातून दोनदा घेतला जाईल. वेगवेगळ्या विषयातील तज्ज्ञ / अधिकारी हे काम करतील. समितील तज्ज्ञांची संख्या २ पेक्षा कमी नसावी.

**निर्मल ग्राम पुरस्कार**

